राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
आरोग्य सेवांवर लोकाधारित सनियंत्रण
पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
**शासन निर्णय क्र. राग्राअ २००७/प्र.क्र.१७२ /आरोग्य - ७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक : २४ ऑगस्ट २००७**

## प्रस्तावना

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनअंतर्गत आरोग्य सेवांवर लोकाधारित सनियंत्रण तसेच लोकसहभागातून आरोग्य नियोजनाची (Community based monitoring & planning of health services) संकल्पना मांडण्यात आली आहे. या संकल्पनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचे पहिले पाऊल म्हणून देशभरातील आठ राज्यांमध्ये ११ महिने कालावधीचा (एप्रिल २००७ ते जानेवारी २००८) पथदर्शी प्रकल्प राबवला जाणार आहे. या प्रकल्पाच्या प्राथमिक अंमलबजावणीसाठी निवडलेल्या राज्यांत महाराष्ट्र राज्याचाही एक प्रमुख राज्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. या पथदर्शी प्रकल्पाची पुढील प्रमुख उद्दिष्टे आहेत -

१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन व त्याअंतर्गत असलेल्या व उपलब्ध आरोग्य सेवांचे अधिकार यांबाबत जनतेमध्ये जागृती करणे
२) आरोग्य सेवांच्या नियोजनात लोकसहभाग मिळवणे. तसेच आरोग्य सेवांबद्दल आरोग्य सेवेच्या लाभार्थ्यांमध्ये (जनतेत) मालकत्वाची भावना वाढीस लागेल यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठीच्या पद्धती विकसित करणे.
३) आरोग्य सेवेवर लोकाधारित सनियंत्रणासाठी जनतेत आरोग्य सेवेबद्दल हक्काधारित समज विकसित करणे
४) विविध स्वयंसेवी संस्था /संघटनांनी हक्काधारित दृष्टीकोनातून आरोग्य सेवा मिळविण्यासाठी प्रयत्न/प्रयोग केले आहेत. या प्रयोगातून आरोग्य सेवांवर लोकाधारीत सनियंत्रणाची माध्यमे विकसित झाली आहेत. या माध्यमांचा व्यापक पातळीवर अवलंब करणे

सार्वजनिक आरोग्य सेवा यंत्रणेच्या सेवांची पूर्ण माहिती व त्या सेवा मिळवणे, त्यांचे संवर्धन करणे याची जाणीव जनतेत निर्माण व्हावी हे या प्रकल्प प्रक्रियेचे फलित अपेक्षित आहे. अपेक्षित आरोग्य सेवा मिळताहेत याचा नियमित आढावा आरोग्य सेवांचे लाभार्थी तसेच लोकप्रतिनिधी या प्रक्रियेतून घेतील. या प्रक्रियेतून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनने जाहीर केलेल्या हमी सेवा (Guaranteed health services), तसेच अत्यावश्यक औषधे व संदर्भ सेवा मिळण्यातील अडचणी, मर्यादा व आरोग्य सेवांबद्दल लोकांच्या अपेक्षा यांचा पाठपुरावा केला जाईल. तसेच जनतेच्या अपेक्षा आरोग्य यंत्रणेच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. आरोग्य सेवा सनियंत्रण समित्यां मार्फत असा आढावा, पाठपुरावा आरोग्य सेवांच्या विविध टप्प्यांवर घेतला जाईल. अपेक्षित आरोग्य सेवा नाकारली जाणे, आरोग्य सेवा देण्यात गंभीर दुर्लक्ष/हलगर्जी होणे (Denial of

health care) अशा घटनाही या आरोग्य सेवा देखरेख समित्यांमार्फत आवश्यक त्या उपाययोजनांच्या दृष्टीने चर्चिल्या जातील.

आरोग्य सेवांचे लाभार्थी त्यांना मिळणाऱ्या आरोग्य सेवांबद्दल [illegible] आपली मते माहिती नियमितपणे या संनियंत्रण प्रक्रियेतून आरोग्य यंत्रणेकडे पाठवली जाईल. या माहितीच्या आधारे अपेक्षित सुधारणा सुचवल्या जातील. यातून आरोग्य यंत्रणेचे जनतेप्रती उत्तरदायित्व संवर्धित करण्यास मदत मिळेल. देखरेखीसाठी नेमलेल्या समित्या ही माहिती मिळविण्याची प्रक्रिया स्वतंत्रपणे घडवतील; व आपला प्रत्यक्ष अहवाल कळवतील. लोकांना आरोग्य सेवा मिळण्यातील अडचणी व त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या/निकडीच्या आरोग्य सेवांबद्दलच्या अपेक्षा कळण्यास यामुळे आरोग्य विभागाला मदत मिळेल. त्यामुळे जेथे सुधारणांची गरज आहे तेथे आवश्यक उपाययोजना करणे शक्य होईल.

या प्रक्रियेचा एक भाग म्हणून वर्षातून किमान एकदा प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर 'जन सुनवाई' / 'जन संवाद' आयोजित केले जातील. यासारख्या सार्वजनिक कार्यक्रमात आरोग्य सेवांमध्ये सुधारणा घडवण्यासाठी, आरोग्य सेवांबद्दलची आपली मते सर्वसामान्य नागरिक आरोग्य यंत्रणेसोबत मांडतील. आरोग्य सेवांवरील लोकाधारित संनियंत्रणच्या प्रक्रियेतून स्थानिक पातळीवरील आरोग्य नियोजन करणे व आरोग्य सेवा यंत्रणेस बळकटी आणणे यात लोक सहभाग घेतील. त्यामुळे जनतेची आरोग्य सेवांप्रती पालकत्वाची भावना वाढीस लागेल.

आरोग्य सेवांशी संबंधित सर्व हितसंबंधी गटांचे प्रतिनिधित्व असलेल्या समित्यांतर्फे ही संनियंत्रण प्रक्रिया विविध [illegible] घडवली जाईल. या प्रक्रियेत पंचायत सदस्य, जनतेच्या हक्कांसाठी कार्यरत जनसंघटना, स्वयंसेवी संस्था, बचत गटांचे प्रतिनिधी हे आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत सहभागी होतील. या समित्यांमध्ये व्यापक जनसहभाग मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे अपेक्षित आहे. विशेषतः हक्काधारित दृष्टीकोनातून समाजकार्य करणाऱ्या संस्था/संघटनांचे प्रतिनिधित्व मिळविणे अनिवार्य आहे. ह्या संनियंत्रण समित्या पथदर्शक प्रकल्पासाठी निवडलेल्या जिल्ह्यात गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर संनियंत्रणासाठी विविध उपक्रम हाती घेतील. गावबैठका, आरोग्य अधिकाऱ्यांच्या मुलाखती, आरोग्य सेवांचा लाभ घेणाऱ्या रुग्णांच्या मुलाखती, संनियंत्रण समिती सदस्यांची निरीक्षणे, जन सुनवाई अथवा जन संवाद इत्यादींचा या उपक्रमात समावेश असेल.

सध्या आरोग्य सेवेवरील लोकाधारित संनियंत्रणचा पथदर्शी [illegible] खालील [illegible] राबविले आहे.

**१) प्रायोगिक प्रकल्पासाठी निवडलेले जिल्हे -**

आरोग्य सेवांवर लोकाधारित संनियंत्रणाच्या पथदर्शी प्रकल्पासाठी खालील जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे

१. अमरावती
२. नंदूरबार
३. उस्मानाबाद
४. पुणे
५. ठाणे

**१) आरोग्य सेवांवर लोकाधारित प्रायोगिक प्रकल्पाची व्याप्ती -**

या प्रकल्पा अंतर्गत वर उल्लेखित जिल्ह्यात खालील कार्यक्षेत्रांचा समावेश असेल -

- प्रत्येक जिल्ह्यातील तीन तालुके
- निवडलेल्या तालुक्यातील तीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यांचे कार्यक्षेत्र
- निवडलेल्या प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील पाच गावांचा समावेश या प्रकल्पात केला जाईल.

२) राज्यस्तरीय सुकाणू समिती

या पथदर्शी प्रकल्पास मार्गदर्शन करणे, प्रकल्पासंबंधी महत्वाचे निर्णय घेण्यासाठी राज्य पातळीवर राज्य सुकाणू समिती तयार करण्यात आली आहे. या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे आहेत -

१) श्रीमती चंद्रा अय्यंगार, प्रधान सचिव, (आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग), महाराष्ट्र राज्य
२) श्रीमती वंदना कृष्णा, आयुक्त (कुटुंब कल्याण विभाग), महाराष्ट्र राज्य
३) डॉ. प्रकाश डोके, संचालक, आरोग्य सेवा विभाग, महाराष्ट्र राज्य
४) श्री. एम. एस. चौधरी, संचालक, राज्य ग्रामीण आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य
५) सचिव, ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र राज्य किंवा त्यांचे प्रतिनिधी
६) डॉ. अनंत फडके
७) डॉ. शशिकांत अहंकारी
८) डॉ. सुधा कोठारी
९) डॉ. सतिश गोगुलवार
१०) डॉ. अशोक दयालचंद
११) मनीषा गुप्ते
१२) अंजली कुलकर्णी
१३) भिम रास्कर
१४) डॉ. शाम अष्टेकर
१५) डॉ. अभय शुक्ला

(राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन, भारत सरकारच्या ॲडवायजरी ग्रुप फॉर कम्युनिटी ॲक्शनचे (AGCA) सदस्य डॉ. शाम अष्टेकर व डॉ. अभय शुक्ला हे राज्यस्तरीय सुकाणू समितीचे कायमस्वरुपी निमंत्रित सदस्य असतील.)

**४) राज्य नोडल (प्रकल्प संचालक) संस्थेची नियुक्ती -**

साथी-सेहत पुणे ही स्वयंसेवी संस्था महाराष्ट्र राज्यातील पाच जिल्ह्यात सदरहू पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून प्रकल्प कालावधीत कार्यरत राहील. प्रकल्पातील राज्य पातळीच्या उपक्रमांचे आयोजन, संचालन व प्रकल्पासाठी उपयुक्त साहित्य निर्मितीची जबाबदारी या संस्थेकडे असेल. तसेच प्रकल्पासाठी निवडलेल्या पाचही जिल्ह्यांना सल्ला-संसाधन पुरविण्याचे कार्य या संस्थेमार्फत होईल.

सचिव, महिला व बाल विकास विभाग, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त(कुक) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
संचालक, राज्य ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई
सर्व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
सर्व सह संचालक/उप संचालक, आरोग्य सेवा
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी
महालेखापाल-१/२, महाराष्ट्र(लेखा परिक्षा)(लेखा व अनुज्ञेयता)मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सा.आ.वि.मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा.मंत्री(आरोग्य) मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव,मा.राज्यमंत्री(आरोग्य),मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती आरोग्य-६

परिशिष्ट - अ

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हा नोडल संस्थांची नावे | जिल्ह्यात निवडलेले तालुके |
| --- | --- | --- | --- |
| १ | अमरावती | खोज-मेळघाट<br>पत्ता - द्वारा- दशदेवी कुक्कुट पालन केंद्र,<br>भोरखेड, (कुंडी), तालुका - अचलपूर,<br>जिल्हा- अमरावती - ४४४ ८०५<br>संपर्क व्यक्ती - बंडू साने | १) धारणी<br>२) चिखलदरा<br>३) अचलपूर |
| २ | नंदुरबार | जनार्थ आदिवासी विकास संस्था<br>प्लॉट नंबर- ८, रामगिरी, विजय नगर, तालुका- शहादा<br>जिल्हा - नंदुरबार - ४२५ ४०९<br>संपर्क व्यक्ती- रंजना कान्हेरे | १) अक्कलकुवा<br>२) धडगाव<br>३) शहादा |
| ३ | उस्मानाबाद | ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र,<br>टाटा सामाजिक विज्ञान संस्था, ग्रामीण विकास<br>परिसर-तुळजापूर, पोस्ट बॉक्स नंबर - ९, तुळजापूर,<br>जिल्हा - उस्मानाबाद-४१३ ६०२<br>संपर्क व्यक्ती - अंजली कुलकर्णी | १) उस्मानाबाद<br>२) तुळजापूर<br>३) कळंब |
| ४ | पुणे | मासूम (महिला सर्वांगिण उत्कर्ष मंडळ)<br>कुबेरा विहार, बिल्डींग नंबर - डी-१, सर्वे नंबर - २२६ए/१/१,<br>फ्लॅट नंबर - ४१-४४, ६ वा मजला, गाडीतळ, हडपसर,<br>पुणे- ४०० ०२८<br>संपर्क व्यक्ती- अनुपमा पाठक | १) वेल्हे<br>२) पुरंदर<br>३) खेड |
| ५ | ठाणे | वन निकेतन<br>सोनार पाडा, मु. पो. - मुरबाड,<br>जिल्हा - ठाणे- ४२१ ४०१<br>संपर्क व्यक्ती - [illegible] | १) डहाणू<br>२) जव्हार<br>३) मुरबाड |

५) जिल्हा नोडल (प्रकल्प संचालक) संस्थेची नियुक्ती -

जिल्हा पातळीवर प्रकल्पातील उपक्रमांच्या संचालनासाठी खालील संस्थांची निवड करण्यात आली आहे. तालुका पातळीवर निवड झालेल्या संस्थांमध्ये समन्वय, जिल्हा पातळीच्या प्रशिक्षणांचे आयोजन, जन सुनवाई यासारख्या प्रकल्पातील विविध उपक्रमात जिल्ह्यातील आरोग्य मंत्रणा प्रकल्प राबविण्यासाठी या संस्थांना सर्वतोपरी मदत करेल -

| जिल्हा | जिल्हा नोडल (प्रकल्प संचालक) संस्था |
|---|---|
| अमरावती | खोज - मेळघाट |
| नंदूरबार | जनार्थ आदिवासी विकास संस्था |
| उस्मानाबाद | ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर |
| पुणे | मासुम (महिला सर्वांगिण उत्कर्ष मंडळ) |
| ठाणे | वन निकेतन |

**६) प्रकल्पासाठी निवडलेल्या गावातील ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचा आरोग्य सेवा संनियंत्रण समिती म्हणून विस्तार करणे-**

गाव पातळीवर सध्या कार्यरत असलेल्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आरोग्य संनियत्रण व मार्गदर्शक समिती म्हणून कार्यरत होतील. या समित्यांची सध्याची कर्तव्ये विचारात घेता आरोग्य सेवांवर संनियंत्रणाची जबाबदारी या समित्यांवर सोपवितांना स्वयंसेवी संस्था/हक्काधारित कार्य करणाऱ्या जनसंघटना यांच्या प्रतिनिधींची निवड या समित्यांवर करुन सदरहू समित्यांचा विस्तार प्रकल्पासाठी निवडलेल्या गावांमध्ये करावा. प्रकल्पासाठी निवडलेल्या जिल्ह्यांतील तीन तालुक्यातील १५ गावांमधून या समित्यांचा पथदर्शी प्रकल्पात विस्तार होईल. ज्या गावांमधून ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या स्थापन झालेल्या नसतील अशा ठिकाणी प्रकल्पात निवडलेल्या गावात त्या जिल्ह्यात/तालुक्यात प्रकल्पाअंतर्गत कार्यरत स्वयंसेवी संस्था समिती स्थापनेच्या प्रक्रियेत सहभाग घेऊ शकतील. (जिल्हा, तालुका व संस्थांची नावे परिशिष्ठ-अ मध्ये सोबत दिली आहेत.)

**७) आरोग्य सेवांवर लोकाधारित संनियत्रण च्या प्रकल्प अंमलबजावणीसाठी प्रशासकीय अधिकारी, पंचायत सदस्य व प्रकल्प राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्था/संघटना यांच्यात सहकार्य व समन्वय -**

आरोग्य सेवांवर लोकाधारित संनियत्रण प्रकल्प जिल्ह्यांतील विविध पातळ्यांवरील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा प्रकल्प समन्वयक तसेच वैद्यकीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या पथदर्शी प्रकल्पात सर्वतोपरी समन्वय साधून प्रकल्पाची अमंलबजावणी यशस्वीपणे करण्यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी

(शोमिता बिश्वास)
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव

प्रति

आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, नवी मुंबई.